दि. २७/१०/२०१८

## ❖ दिवाळी सणाच्या मोक्यावर भारती विदयापिठ पोलीस स्टेशन कडुन गायीच्या तुपामध्ये भेसळ करणा–या गोडावुन वर छापा

दि. २४/१०/२०१८ रोजी २०:५१ वाजता कात्रज चौकात अॅक्टीव्हा मोटारसायकल क्र. एम एच १२ पी के ३८२१ याचे वर एक इसम भेसळ युक्त गायीचे तुप विक्री करण्याकरीता कात्रज चौकात येणार असल्याची भारती विदयापिठ पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पो.शि./८४४२ गणेश चिंचकर यांना गुप्त बातमीदारा करवी गुप्त माहिती प्राप्त झाली. सदर बातमीचा आशय मा. वरिष्ठांना सांगितली असता, त्यांनी सापळा रचुन, संशयितास ताब्यात घेऊन बातमीची खातरजमा करण्याचे आदेश दिले.

प्राप्त आदेशान्वये भारती विदयापिठ पो.स्टे. येथे नेमणुकीस असलेले सहा पोलीस निरीक्षक श्री चिवडशेट्टी, सहा पोलीस निरीक्षक श्री उमरे व तपासपथकातील स्टाफ असे दोन पंचांना सोबत घेऊन कात्रज चौकात विखरून सापळा रचला. सायंकाळी २१:०० वाजण्याच्या सुमारास अॅक्टीव्हा मोटारसायकल क्र. एम एच १२ पी के ३८२१ याचे पायदान वर प्लॅस्टिकच्या गोणी मध्ये १५ किलो वजनाचा खादयतुपाचे डब्यासह इसम नामे केशरसिंग मानसिंग राठोड, वय ४०, रा. अप्पर इंदीरानगर, पुणे यास ताब्यात घेतले. त्याचे कडे केलेल्या चौकशीत त्याने गायीचे खादयतुपा मध्ये तेल व डालडा घालुन भेसळ करून ग्राहकांना विक्री करीत असल्याचे कबुल करून गंगाधाम चौका जवळील एका गोडावुन (गाळा) मध्ये भेसळ करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावरून सहा पोलीस निरीक्षक श्री उमरे यांनी मा. सहा. आयुक्त, अन्न व भेसळ प्रशासन यांचेशी त्यांचे मोबाईल वर संपर्क साधुन १) श्री पी पी गुंजाळ, अन्न सुरक्षा अधिकारी, पुणे व २) श्री भांबरे, अन्न सुरक्षा अधिकारी, पुणे यांची मदत प्राप्त केली.

खादय गायीचे तुप भेसळ बाबत कायदेशिर कारवाई करण्यास भारती विदयापिठ पोलीस स्टेशन येथे आलेले अन्ना सुरक्षा अधिकारी, दोन पंच, सहा पोलीस निरीक्षक श्री चिवडशेट्टी, सहा पोलीस निरीक्षक श्री उमरे व तपासपथकातील कर्मचारी असे सर्वजण चौकशी करीता ताब्यात घेतलेल्या इसमास तो सांगत असलेल्या गोडाऊन वर छापा मारण्याकरीता भारती विदयापिठ पोलीस स्टेशन येथुन रवाना झालो.

गंगाधाम चौकाजवळील न्यु इरा सोसायटी मधिल नोबेल एक्सेलन्सी या इमारतीतील शॉप नं. ८, बिबवेवाडी कोंढवा रोड, पुणे या ठिकाणी त्याचे खादय गायीचे तुपाचे गोडावुन छापा मारला असता, गोडावुन मध्ये भेसळ असलेले खादय गायीचे तुपाचे २५ डबे, विना लायसेन्स बेकायदेशिर पणे भेसळ करण्याकरीता दोन ६० किलोचे गायीचे पिवळे रंगाचे तुप भरून असलेले दोन मोठे जार उघडया स्थितीत निष्काळजीपणे ठेवलेले मिळुन आले. तसेच वजन काटा, भेसळ करण्याकरीता आवश्यक साहित्य तेथे मिळुन आले. सर्व दिसत्या परिस्थितीचा रात्री उशिरापावेतो वरील नमुद अन्न सुरक्षा अधिकारी १) श्री पी पी गुंजाळ, अन्न सुरक्षा अधिकारी, पुणे २) श्री भांबरे, अन्न सुरक्षा अधिकारी, पुणे यांनी दोन पंचांचे समक्ष पंचनामा करून बेकायदेशिर तुपाचा साठा मिळुन आलेले गोडावुन चौकशी करीता सिल बंद करून, मिळुन आलेला संशयित अपायकारक भेसळयुक्त गायीचे तुप एकुण ४१२ किलो वजनाचा आणि एकुण १५००६०/– रू. किंमतीचा माल जप्त केला आहे. जप्त माला मधिल सिल व लेबल्स् सह सॅपल्स राज्य आरोग्य प्रयोगशाळा, बिशप हायस्कुल जवळ, पुणे तपासणीकरीता पाठविण्यात येणार असुन, पुढील योग्य ती कायदेशिर कारवाईची प्रक्रिया चालु आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे मा. पोलीस उप आयुक्त श्री बच्चनसिंग, मा. सहा पोलीस आयुक्त श्री रविंद्र रसाळ, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापिठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री विष्णु ताम्हाणे, सहा पोलीस निरीक्षक श्री श्रीशैल चिवडशेट्टी, सहा पोलीस निरीक्षक श्री उमरे व तपासपथकातील स्टाफ चंद्रकांत फडतरे, कृष्णा बढे, सर्फराज देशमुख, सचिन पवार, गणेश चिंचकर, महेश मंडलिक, राहुल तांबे, कुंदन शिंदे, अभिजीत रत्नपारखी यांनी केलेली आहे.